# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २६९ - २३ दिनांक : - २१/०८/२०२३

## अपहृत मुलीचा यशस्वी रित्या शोध.

दिनांक ०४/०७/२०२३ रोजी फिर्यादी श्री.अखिलेश रामबाबु चौरसिया, वय ४० वर्षे, धंदा- नोकरी, रा.आदर्शनगर पडखळपाडा, आचोळे डोगरी, नालासोपारा पुर्व ता.वसई, जि.पालघर यांची मुलगी वय १६ वर्षे.७ महीणे, १० दिवस, हिस कोणीतरी अज्ञात इसमाने तिस कशाचे तरी आमीष दाखवून फूस लावून पळवून नेलेबाबत आचोळे पोलीस ठाणे गुरक्र. ३२९/२०२३ भा.दं.वि.सं कलम ३६३ प्रमाणे दि.०४/०७/२०२३ रोजी १९.१७ वा. गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

नमुद गुन्हा दाखल झालेपासुन प्रथम तपास पोउनि/संदिप भोसले यांनी केला होता परंतु अपहृत मुलगी अथवा आरोपीत मिळुन आला नाही.तदनंतर नमुद गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि/ रेखा पाटील यांचेकडे देण्यात आला नमुद तपासी अधिकारी यांनी गुन्हयाचा तपास होती घेतल्यानंतर फिर्यादीचे राहते परिसरात पुन्हा- पुन्हा जावुन तपास केला असता मिळालेल्या माहितीच्या आधारे पेन, ता.पनवेल, जि.रायगड येथे जावुन तपास करुन तसेच तांत्रिक विश्लेषण करुन साक्षीदार यांचेकडे तपास केला परंतु अपहृत मुलीचा शोध लागला नाही. त्यानंतर पुन्हा मुरबाड मुरबाड व कुडवली एम.आय.डी.सी. मधील सुमारे १५० कंपीनीमध्ये अपहृत हिचा शोध घेतला परंतु अपहृत मुलगी मिळुन आली नाही म्हणुन एम.आय.डी.सी. परिसरातील कमी पैशामध्ये भाडे तत्वावर भेटणाऱ्या रुमबाबत माहिती घेवून त्या परिसरातील सुमारे ७० रुम चेक केल्या असता एका रुम मध्ये अपहृत मुलगी मिळुन आली तिस पोलीस ठाणे येथे घेवून येवून तिच्याकडे विचारपुस केली असता तिची एका मुलीशी मैत्री होती व ते अपहृत मुलीच्या आईस आवडत नव्हते म्हणुन तिचे आईवडील तिस पुढील शिक्षणासाठी गावी पाठविणार होती म्हणुन ती कोणास काहीएक न सांगता स्वत:हुन निघुन जावून मुरबाड येथे कंपनीत काम शोधुन काम करत होती असे निष्पन्न झाल्याने अपहरीत मुलगी हिस सुखरुप तिचे आई-वडीलांचे ताब्यात रितसर कारवाई करुन देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२ वसई, श्री. विनायक नरळे, सहा.पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. बाळासाहेब रा.पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आचोळे पोलीस ठाणे, पो.नि. विवेक सोनवणे (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली पो.उप.निरी. रेखा पाटील, व पो.अं. शिवराम शिंदे केली आहे.